# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/५९२ /२०१६/२३

**(नोदंणी क्रमांक २०१६०७००३० )**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- १६.०७.२०१६ |
| निकाल | दिनांक :- २४.०८.२०१६ |

श्री. आर. एम. देवडा (द्वाराः श्री. जे. बी. अमीन) तक्रारदार
प्लॉट नं. ३, दिलीपनगर, चिंतामनी कॉलनी,
जिल्हा औरंगाबाद ४३१ ००१.
(ग्राहक क्रमांक ४९००१०४०२११२)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार आर. एम. देवडा (द्वारा - श्री. जे. बी. अमीन) (ग्राहक क्रमांक ४९००१०४०२११२) प्लॉट नं. ३, दिलीपनगर, चिंतामनी कॉलनी, औरंगाबाद, यांनी दिनांक १६-०७-२०१६ रोजी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफीसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६ च्या अनुसूची -अ नमुन्यात तक्रार दाखल केली आहे तक्रारीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

ग्राहकास ऑगस्ट २०१५ या महिन्यात मीटर जंपींग झाल्यामुळे ३९२३९ युनिटचे रुपये ५६२८८५/- चे जास्त बील देण्यात आले आहे. या विषयी ग्राहकास अंतर्गत ग्राहक निवारण कक्षाने दिलेली ११ जुलै २०१६ ची ऑर्डर मान्य नाही. तरी सदर वीज बील दुरुस्त करण्यात यावे असे तक्रारकर्त्याच्या वतीने श्री. अख्तर अली खान यांनी विनंती केली आहे.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन) नोडल ऑफिसर, महावितरण, औरंगाबाद तर्फे श्री. अ. पी. पठाण, कार्यकारी अभियंता, शहर विभाग-१ यांचे म्हणणे</u>**

१) कार्यकारी अभिंयता यांचे दिनांक ०२.०८.२०१६ च्या पत्रानुसार ग्राहकास माहे ऑगस्ट २०१६ मध्ये एकदम ३९२३९ युनिटचे व जास्त रकमेचे देयक ग्राहकास आल्याची तक्रार प्राप्त झाली होती. हे बील १४ महिन्यात विभागुन रुपये ७५७७४.७४ माहे नोव्हेंबर २०१५ च्या वीज बीलात (Slab Benefit) दुरुस्त करुन वजावट करण्यात आली.

२) ग्राहकास माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये नवीन मीटर बसविण्यात आले असून नवीन मीटरचा सरासरी वापर ६१५ युनिट आहे.

३) मात्र सदरील प्रकरण ग्राहकास मान्य नसल्याने त्यांनी आय जी आर सी कडे तक्रार केली होती. IGRC ने ग्राहकास नवीन मीटर वरील सरासरी वापरानुसार वीज बील दुरस्त करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार प्रतिमाह ६१५ युनिट प्रमाणे फेब्रुवारी २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीतील बील दुरुस्ती करण्यात आली असून रुपये ३६६१७२.९९ ची बिलातून वजावट करण्यात आली आहे.

४) सदर ग्राहकाच्या मीटरची चाचणी दिनांक १८.०२.२०१६ रोजी करण्यात आली. मीटर Abnormal असल्याचे म्हटले आहे. तसेच पुढील मिटर चाचणी मिटर निर्माता कंपनीकडुन करण्यात यावी असे सुचविले होते. सदर कंपनीने मीटर Defective असल्याचे म्हटले आहे.

५) स्थळ पाहणी अहवालानुसार मंजूर भार ५ KW असून जोडलेला भार ५.२७५ KW असा आहे. महावितरणचे वाणिज्यक परिपत्रक क्रमांक १३३ नुसार जोडलेल्या भाराप्रमाणे एक महिन्याचा वीज वापर काढण्यासाठीची पध्दत पुढील प्रमाणे आहे.

जोडभार (KW) x D.F. x 0.25 x 24 तास x 30 = युनिट (प्रतिमाह)

= 5.275 KW x 0.25 x 24 तास x 30

= 950 युनिट वापर (प्रतिमाह) आहे.

तरी सुध्दा आयजीआरसी च्या आदेशाप्रमाणे ग्राहकास नवीन मीटर वरील सरासरी वापरानुसार प्रतिमाह ६१५ युनिट या प्रमाणे फेब्रुवारी २०१५ ते जानेवारी २०१६ च्या कालावधीतील बील दुरुस्ती करण्यात आली असून रुपये ३६६१७२.९९ बील दुरुस्ती करुन देण्यात आली आहे.

६) सदर ग्राहकाने माहे मार्च २०१४ पासून वीज बील भरलेले नसून वीज वापर चालू असून सुध्दा ग्राहक वीज बील भरावयास टाळाटाळ करीत आहे. तरी ग्राहकास सदरील थकबाकी भरण्यासाठी मा. ग्राहक तक्रार निवारण मंचाने आदेशीत करावे अशी विनंती मंचास केलेली आहे.

<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>

१ ) ग्राहकास माहे ऑगस्ट २०१५ मध्ये एकदम ३९२३९ युनिटचे व जास्त रकमेचे देयक आल्याची तक्रार महावितरणास करण्यात आली होती.

२ ) ग्राहकाचे मीटर Defective असल्याचे मीटर उपत्पादन करणा-या कंपनीने महावितरणला कळविले आहे.

३ ) ग्राहकाचे मीटर ऑगस्ट २०१५ मध्ये Defective झाल्याचे CPL वरुन तसेच ग्राहकाने केलेल्या तक्रारीवरुन दिसून येते.

४ ) ग्राहकास फेब्रुवारी २०१६ मध्ये नवीन मीटर बसविल्याचे दिसून येते. नवीन मीटरचा वापर सरासरी ६१५ युनिट प्रतिमाह असल्याचे दिसून येते.

५) फेब्रुवारी २०१५ ते जानेवारी २०१६ पर्यंत विजेचा वापर सरासरी ६१५ युनिट नवीन मीटर प्रमाणे असा धरुन वीज बील IGRC चे आदेशानुसार दुरुस्त करुन दिले आहे.

६ ) मीटर Defective झाल्यास वीज वापर काढण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनिमय २००५ च्या कलम १५.४.१ अधिनियमाच्या भाग १२ आणि भाग १४ मधील तरतुदींना अधीन राहून मीटर सदोष असेल तर तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यात आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यात आला असेल तर मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येईल.

पंरतु आणखीं असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले असल्यास ज्या महिन्यात नोंदी घेणे थांबले गेले असल्यास त्याच्या मागील जास्तीत जास्त तीन महिने पर्यंत ज्या महिन्याचे वीज देयक तयार करण्यात येणार आहे, त्या महिन्यापर्यंत मागील बारा महिन्यात मीटरवर नोंदल्या गेलेल्या वीजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्यात येईल.

७) खालील महिन्यात घेण्यात आलेली मीटर रिडींग

| **महिना** | **युनिट** |
|---|---|
| जुलै २०१५ | ० |
| जून २०१५ | ० |
| मे २०१५ | ० |
| एप्रिल २०१५ | २४ |
| मार्च २०१५ | ० |
| फेब्रुवारी २०१५ | १९ |
| जानेवारी २०१५ | ६४ |
| डिसेंबर २०१४ | ० |
| नोव्हेंबर २०१४ | ० |
| ऑक्टोबर २०१४ | १६ |
| सप्टेंबर २०१४ | ८४ |
| ऑगस्ट २०१४ | १४५ |
| **एकुण** | **३५२** |

मागील बारा महिन्यात वीजेचा दरमहा सरासरी वापर = 352/12 = 30 युनिट प्रतिमाह (अंदाजे)

८) ग्राहकास नियमानुसार मे २०१५ पासून नवीन मीटर बदलविण्या पर्यंत सरासरी दरमहा ३० युनिट प्रमाणे वीज बील देण्यात आले पाहिजे.

वरील वस्तुस्थितीचा विचार करता खालील आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१) ग्राहकास मे २०१५ पासून बदलविण्यात आलेल्या नवीन मीटरचे वाचन नियमित येईपर्यंत दरमहा सरासरी ३० युनिट प्रमाणे वीज बील देण्यात यावे.

२) जूने वीज बील रदद करुन वरील (१) प्रमाणे सुधारीत वीज बील देण्यात यावे.

३) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसांत सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |